## *पर्यावरणाचे रक्षण केले तरच आपले भविष्य उज्ज्वल आहे.... डॉ इंद्रजीत भगत*

*माझी वसुंधरा अभियान"* अंतर्गत दि. 30.05.2022 ते दि. 05.06.2022 या कालावधीत नियोजित केलेल्या *"पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह"* अंतर्गत आज दिनांक ०१ जून २०२२ रोजी सकाळी १०:३० ते ११:३० वा. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी यशवंतराव चव्हाण चौक येथील *स्मशान भूमी परिसर* स्वच्छता व वृक्ष संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित स्वच्छता व पर्यावरण संरक्षण मोहिमेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. उपक्रमात सुरवातीला प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा निर्धार करण्याची शपथ दिली. स्मशानभूमी परिसरात असलेल्या प्लास्टिक, पॉलिथिन पिशव्या, फुल हार, व इतर अविद्राव्य घटकांना यावेळी स्मशानभूमी परिसरातून जमा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. परिसर स्वच्छ करताना विद्यार्थ्यांनी



सकाळ

### स्मशानभूमी परिसराची विद्यार्थ्यांकडून स्वच्छता

अंबाजोगाई, ता. १ : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्मशानभूमी परिसराची स्वच्छता केली. माझी वसुंधरा अभियान या अंतर्गत पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताहात सोमवारी (ता.३०) हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात प्रारंभी प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाची शपथ दिली. त्यानंतर सर्व सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्मशानभूमीतील कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. इंद्रजीत भगत, श्रीपाद कदम, नरेंद्र चोले आदी उपस्थित होते.



अंबाजोगाई : स्मशानभूमीत स्वच्छता करताना यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील सेवा योजनेचे स्वयंसेवक.

Aurangabad, Beed-Today
02/06/2022 Page No. 4

"करूया पर्यावरणाचे रक्षण, कमी करून प्रदूषण." "ठेऊया पर्यावरणाचे ध्यान, नाहीतर होईल आपलेच. नुकसान."

"निरोगी असेल धरा तर सुख नांदेल घरा-घरा." "देईल आपल्याला औषध पाणी, पर्यावरणाची करा निगराणी." अशा विविध घोषवाक्यांनी परिसरात उत्साह निर्माण केला. कार्यक्रम अधिकारी इंद्रजीत भगत यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना "प्रत्येकाने एक तरी झाड दरवर्षी लावले पाहिजे. सार्वजनिक वृक्ष लागवड, सामाजिक वनिकरण, स्वच्छता अभियान, प्रदूषण नियंत्रण यांसारखे कार्यक्रम आयोजित केले पाहिजे" असे सांगितले.

याप्रसंगी 18 स्वयंसेवकांसह कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजीत रामदास भगत, श्री श्रीपाद कदम, श्री नरेंद्र चोले यांनी विद्यार्थ्यांना स्मशानभूमी परिसर स्वच्छता वृक्षसंवर्धन मोहीमेला मार्गदर्शन केले.

## *आंतरराष्ट्रीय योगा दिवस निमित्ताने काऊंट डाउन उपक्रमात सामान्य योग प्रदर्शन व योग विराम अभ्यास कार्यशाळा संपन्न.*

म.शि. प्र. मंडळ संचलित *यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई* येथे *राष्ट्रीय सेवा योजना* विभागाच्या वतीने दिनांक १४. ५. २०२२ रोजी सकाळी ७.३० ला. आंतरराष्ट्रीय योगा दिवस २०२२ काऊंट डाउन उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ हे होते. तर मार्गदर्शक प्रशिक्षक म्हणून योग प्रशिक्षक प्रा. डॉ. रणधीर कदम होते. डॉ रणधीर कदम यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना योगा अभ्यासा अंतर्गत येणाऱ्या विविध योगमुद्राचे मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक करून दाखविले. योगा अभ्यास झाल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना योग साधना करीत असताना आपण कुठे कुठे थांबावे श्वास कुठे घ्यावा व उच्छ्वास कुठे सोडावा याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार झाला. 21 जून 2022 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस 2022 संपूर्ण भारतभर साजरा होणार आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन 2022 यासाठी 100 दिवसांची मोहीम तयार केली आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन 2022 थिम :- '100 days,100 cities & 100 organizations' असून आंतरराष्ट्रीय योग दिन 21 जून 2022 रोजी प्रथमच 75 वारसा स्थळे, सांस्कृतिक स्थळावर या वर्षी योग प्रात्यक्षिके यांचे आयोजन करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन 21 जून 2022 हा एकुणच 8 वा योग दिन. 21 जून 2015 रोजी पहिला योग दिन साजरा करण्यात आला. मागील वर्षी 2021 ला योगा दिन थिम - 'yoga for wellness' ही होती. या वर्षी योग दिन संपूर्ण भारतभर नवतरूणांना योगाचे महत्त्व दर्शविणारा ठरावा याकरिता आंतरराष्ट्रीय योग दिवस 2022 करिता एका विशिष्ट कृती आराखडा तयार करण्यात आलेला असुन योग दिनापूर्वी वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे योग दिवस साजरा करण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालय स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे योगा संबंधित विविध उपक्रम आयोजित केलेले आहे. आज दिनांक 14 मे 2022 रोजी सामान्य योग प्रदर्शन आणि योग विरार अभ्यास यावर त्या अनुषंगाने कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला डॉ अरविंद घोडके, डॉ दिलीप भिसे, डॉ अनंत मरकाळे, डॉ राजाभाऊ भगत, डॉ अहिल्या बरूरे, प्रा अमोल सोळुंके, प्रा नरेंद्र चोले, प्रा श्रीपाद कदम, प्रा दिगंबर व्हंडकर, श्री राम सरवदे श्री शेख ख्वाजा व श्री सतिश गायकवाड यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहूण्यांचा फरिचय *प्रा. डॉ. इंद्रजीत भगत* यांनी दिला. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. धर्मराज तांदुळजेकर यांनी व्यक्त केले.

सकाळ



अंबाजोगाई : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय योगा दिन कार्यक्रमाची तयारी करताना प्रध्यापक, विद्यार्थी

### आंतरराष्ट्रीय योगा दिनाचा काऊंटडाउन उपक्रम

**अंबाजोगाई :** पुढील महिन्यात (ता.२१) होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी (ता.१४) येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सामान्य योग प्रदर्शन व योग अभ्यास कार्यशाळा झाली. त्यात विद्यार्थ्यांना विविध योगमुद्रांबाबत मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात शनिवारी सकाळी साडेसात वाजता हा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा काऊंटडाउन उपक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ होते. योग प्रशिक्षक प्रा. डॉ. रणधीर कदम यांनी विविध योगमुद्रांबाबत मार्गदर्शन केले. डॉ. अरविंद घोडके, डॉ. दिलीप भिसे, डॉ. अनंत मरकाळे, डॉ. राजाभाऊ भगत, डॉ. अहिल्या बरूरे, प्रा. अमोल सोळुंके, प्रा. नरेंद्र चोले, प्रा. श्रीपाद कदम, प्रा. दिगंबर व्हंडकर, श्री. राम सरवदे, शेख ख्वाजा, सतीश गायकवाड यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. प्रा. इंद्रजीत भगत यांनी सूत्रसंचालन तर डॉ. धर्मराज तांदुळजेकर यांनी आभार मानले.

Aurangabad, Beed-Today
15/05/2022 Page No. 3

***यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये राजश्री शाहू महाराज स्मृति शताब्दी निमित्त अभिवादन व व्याख्यान संपन्न...***

*राजश्री शाहू महाराज खऱ्या अर्थाने लोक राजे होते...ॲड. संदीप थोरात, औरंगाबाद*

अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे आज दिनांक 6 मे 2022 रोजी राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी दिनानिमित्त, महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून *ॲड. संदीप थोरात,* सामाजिक कार्यकर्ते औरंगाबाद यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आनंद देशमुख संचालक, राष्ट्रीय सेवा योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांची या प्रसंगी मुख्य आयोजक म्हणुन प्रमुख उपस्थिती होती.



मराठवाडा साथी

# राजश्री शाहू महाराज खऱ्या अर्थाने लोक राजे होते- ॲड. संदीप थोरात

**अंबाजोगाई /प्रतिनिधी-**

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे आज दिनांक 6 मे 2022 रोजी राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी दिनानिमित्त, महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून ॲड. संदीप थोरात, सामाजिक कार्यकर्ते औरंगाबाद यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आनंद देशमुख संचालक, राष्ट्रीय सेवा योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांची या प्रसंगी मुख्य आयोजक म्हणुन प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख वक्ते ॲड. संदीप थोरात यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या कार्यकर्तृत्व, व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूवर सविस्तर भाष्य केले. राजश्री शाहू महाराज हे सर्वार्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा जपणारे नेतृत्व होते. ते लोकांचे राजे होते. लोकांच्या प्रगतीसाठी, आनंदासाठी, सामाजिक सांस्कृतिक दर्जा उंचविण्यासाठी विविध कायदे, नियम, उपक्रम त्यांनी आवर्जून राबविले. लोक कल्याणकारी, लोकांच्या मनातील राजा म्हणून

(पान 7 वर...)

BEED Edition
May 8, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

याप्रसंगी प्रमुख वक्ते ॲड. संदीप थोरात यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या कार्यकर्तृत्व, व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूवर सविस्तर भाष्य केले. राजश्री शाहू महाराज हे सर्वार्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा जपणारे नेतृत्व होते. ते लोकांचे राजे होते. लोकांच्या प्रगतीसाठी, आनंदासाठी, सामाजिक सांस्कृतिक दर्जा उंचविण्यासाठी विविध कायदे, नियम, उपक्रम त्यांनी आवर्जून राबविले. लोक कल्याणकारी, लोकांच्या मनातील राजा म्हणून राजश्री शाहू महाराज यांचे स्थान कायम अबाधित राहील, असे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी म्हणून उपस्थित असलेले डॉ. आनंद देशमुख यांनी छत्रपती शाहू महाराज हे महान राजे होते तळागाळातील

वंचित, शोषित लोकांच्यासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्य कायम स्मृतीत राहणारे आहे. त्यांच्या विचाराचा वारसा घेऊन आजच्या नेतृत्वाने, सत्ता करणाऱ्या नेतृत्वांनी कार्य केले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांनी राजश्री शाहू महाराज हे द्रष्टे राजे होते. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर  देशभरामधील आदर्श राजांपैकी ते होते. आरक्षणाचे जनक म्हणून त्यांना ओळखले जाते. माणसाला दुय्यमत्व देणाऱ्या विविध प्रथा, रूढी त्यांनी बंद केल्या व माणसाचे जगणे आनंदित होण्यासाठी त्यांनी अनेक कायदे केले. आपल्या संपूर्ण हयातीत त्यांनी प्रजेच्या विकासासाठी मूलभूत कार्य केले. असे महत्वपूर्ण विचार त्यांनी व्यक्त केले. प्रारंभी राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. शाहु महाराजांच्या कार्य कर्तृत्वाला या प्रसंगी उजाळा देतांना 100व्या स्मृती दिनानिमित्त सर्वांनी 100सेकंद स्तब्धता व मौन राखुन त्यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी *डाॅ.इंद्रजित भगत* यांनी केले.  प्रमुख वक्ते व पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल श्री. सुनील भोसले यांनी करून दिला. कार्यक्रमाचे आभार प्रा. श्रीपाद कदम यांनी मानले. या व्याख्यानास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "रक्तदान करून आनंदी राहण्याचे कारण मिळवा आणि एखाद्याच्या आनंदाचे कारण बना."...... प्राचार्य शिवदास शिरसाठ

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे आज दिनांक 30 मे 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मंचावर रक्तदान शिबिर कार्यक्रमाकरिता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दत्तात्रय (आबा) पाटील, डॉ नरेंद्र काळे, प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ, उपप्राचार्य डॉ रमेश शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत भगत, व लेफ्टनंट रोहित पाटील यांची उपस्थिती होती. रक्तदान शिबिर साठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी दत्तात्रय आबा पाटील यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व सांगताना *"तुमच्या रक्तदानमुळे एक जीव पुन्हा या सृष्टीत नवीन ऊर्जा प्राप्त करून जिवंत होऊ शकतो. युवा पिढीने ऊर्जावान युवा पिढीला निर्माण करावे त्यासाठी रक्तदान हे श्रेष्ठदान समजावे.'* असे विधान केले. प्राचार्य डॉ शिवदास शिरसाट यांनी " तुमचे रक्त दुसऱ्याचे जीवन आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठदान. मंदीरात जाऊन करता ईश्वरसेवा,रक्तदान करून करा समाजसेवा. *"रक्तदान करून आनंदी राहण्याचे कारण मिळवा आणि एखाद्याच्या आनंदाचे कारण बना."* असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी डॉक्टर नरेंद्र काळे यांनी आपल्या



पुण्यनगरी

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन

**अंबाजोगाई/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सोमवार ३० मे रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ, उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, डॉ. नरेंद्र काळे, दत्तात्रय पाटील, इंद्रजीत भगत,लेफ्टनंट रोहीत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सोमवार ३० मे रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न झाले. यावेळी २१ विद्यार्थ्यांनी रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदविला.शिबिरार्थी विद्यार्थ्यांना मान्यवरांनी मार्गदर्शन केले.रक्तदान सर्वश्रेष्ठदान आहे. मंदिरात जाऊन करता ईश्वरसेवा,रक्तदान करून करा समाजसेवा.रक्तदान करून आनंदी राहण्याचे कारण मिळवा आणि एखाद्याच्या आनंदाचे कारण बना. तुमचे रक्त दुसऱ्याचे जीवन आहे असा उपदेशपर सल्ला प्राचार्य शिवदास शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व सांगताना तुमच्या रक्तदानामुळे एक जीव पुन्हा या सृष्टीत नवीन ऊर्जा प्राप्त करून जीवंत होऊ शकतो असे दत्तात्रय पाटील म्हणाले.याप्रसंगी डॉक्टर नरेंद्र काळे यांनी आपल्या संदेशात, 'प्रत्येक पात्र व्यक्ती त्यांच्या आयुष्यात एकदातरी रक्तदान केले तर ते समाजासाठी आदर्श निर्माण करणारे ठरते. रक्तदान शिबीरासाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण महाविद्यालयाचे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. शिबीर यशस्वीतेसाठी राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख रोहीत पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत रामदास भगत,प्रा. सुनील भोसले,डॉ रामेश्वर जगदाळे,श्रीपाद कदम,अमोल सोळुंके, नरेंद्र चोले,राम सरोदे व शेख खाजा यांनी सहकार्य केले.

Smart Beed
Page No.2 May 31, 2022

संदेशात, 'प्रत्येक पात्र व्यक्ती त्यांच्या आयुष्यात एकदातरी रक्तदान केले तर ते समाजासाठी आदर्श निर्माण करणारे ठरते. दर दोन सेकंदाला जगात कुणाला ना कुणाला रक्ताची गरज भासते.' असे मत व्यक्त केले. याप्रसंगी *21 विद्यार्थ्यांनी रक्तदान* केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख *श्री. रोहित पाटील* यांनी तर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी *डॉ इंद्रजीत रामदास भगत* यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला ग्रंथपाल प्रा. सुनील भोसले, डॉ रामेश्वर जगदाळे, श्री श्रीपाद कदम, श्री अमोल सोळुंके, श्री नरेंद्र चोले, श्री राम सरोदे व श्री शेख खाजा यांनी सहकार्य केले.

# *माझी वसुंधरा अभियान”*  आदान तलाव परिसर स्वच्छता उपक्रम

*माझी वसुंधरा अभियान”* अंतर्गत दि. 30.05.2022 ते दि. 05.06.2022 या कालावधीत नियोजित केलेल्या *“पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह”* अंतर्गत आज यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी यशवंतराव चव्हाण चौक येथील *तलाव परिसर स्वच्छता* करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित स्वच्छता मोहिमेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. तलावात असलेल्या प्लास्टिक, पॉलिथिन पिशव्या, फुल हार, व इतर विद्राव्य घटकांना यावेळी तलावातून बाहेर काढून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. याप्रसंगी 41 स्वयंसेवक व स्वयंसेवी कान सह कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजीत रामदास भगत, ग्रंथपाल सुनील भोसले, श्री श्रीपाद कदम, श्री नरेंद्र चोले, श्री सय्यद चाऊस, श्री दिगंबर वंडकर यांनी विद्यार्थ्यांना तलाव परिसर स्वच्छता मोहीमेला मार्गदर्शन केले.



# ⁕ यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सायकल रॅलीचे आयोजन⁕

विश्व सायकल दिवस ०३ जून २०२२ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वतीने अंबाजोगाई येथे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पासून लोखंडी सावरगाव बायपास रोड अशिष सात किलोमीटरची रॅली आयोजित करण्यात आली होती. या सायकल रॅलीमध्ये एकूण 16 सायकलस्वारांनी सहभाग नोंदविला. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय




येथून सुरुवात झालेली ही रॅली सकाळी सात वाजता महाविद्यालयातून निघाली तर 45 मिनिटात ही रॅली लोखंडी लातूर बायपास या नियोजित ठिकाणी पोहोचली.

यावेळी सायकल स्वारांनी विश्व सायकल दिवसानिमित्त विविध घोषणा दिल्या..

*समाधान बनें, प्रदूषण नहीं - साइकिल चलाएं, पृथ्वी बचाएं |*

*अपनी साइकिल बाहर निकाले और चमकाएं, चलो इंडिया साइकिल चलाएं, जीवन को खुशहाल बनाएं, साइकिल अपनाएं| एक बेहतर राष्ट्र के लिए - भविष्य का वाहन, साइकिल सतत गतिशीलता संस्कृति के लिए साइकिल को अपनाएं*

*पापा मुझे साइकिल दिलवा दो आपकी कार मुझे नहीं भाती है | कितना तो पेंट्रोल पीती है और कितना धुआं उडाती है |*

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग यशवंतराव चव्हाण महाविद्यालय यांनी केले होते. अंबाजोगाई शहरातील मान्यवरांना सायकल रॅली मध्ये सहभाग मिळविण्यासाठी सांगितले गेले होते ज्यात नगरसेवक श्री संतोष शिनगारे, श्री दिनेश भारखडीया, श्री नागेश जोंधळे,, श्री अंकुर मोरे, श्री अशोक धीरे, श्री विक्रम सूर्यवंशी, स्वयंसेवक कृष्णा शिंदे अमोल सरवदे, दीपक पवार इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. सायकल रॅलीला कार्यक्रम अधिकारी इंद्रजित भगत यांनी मार्गदर्शन केले.

# *यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात शिव स्वराज्य दिन उत्साहात साजरा*

*यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे **६ जून २०२२** हा दिवस **शिवस्वराज्य दिन** म्हणून साजरा करण्यात आला. रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्र निर्माता असलेल्या या महापुरुषाच्या, लोक कल्याणकारी स्वराज्यातील महत्त्वाचा दिवस म्हणजे 6 जून 1674 म्हणजेच शिवराज्यभिषेक दिन होय. हा दिवस महाराष्ट्र शासन शिवस्वराज्य दिन म्हणून महाराष्ट्रात साजरा करते. संपूर्ण भारतभर हा दिन साजरा केला जातो. शिवस्वराज्य दिनाच्या औचित्याने राष्ट्रीय सेवा योजना विभागाने ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविक करताना कार्यक्रम अधिकारी **डॉ इंद्रजित भगत** यांनी "आजच्या तरुणांमध्ये राष्ट्र घडवण्याचे व चालवण्याची क्षमता आहे. पण इच्छाशक्तीचा अभाव आणि सातत्याने चुकीचे आदर्श यामुळे तरुण आपले सुप्त सामर्थ्य हरवून बसले आहेत. शिवरायांची भवानी तलवार, त्यातून मिळणारी प्रेरणा व तेज फक्त तरुणांनाच न्हवे तर समस्त जगाला अधिकार मिळवून देऊ शकते. तरुणांना आपल्यातील सुप्त सामर्थ्य जाणण्याची गरज आहे आणि त्यांना योग्य दिशा दाखवण्याची जबाबदारी पालकांचीही आहे." अशी भावना आणि अपेक्षा व्यक्त केली



शिवस्वराज्य दिन साजरा करीत असताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करणे, राष्ट्रगीताचे गायन करणे आणि सामाजिक संदेश देणाऱ्या शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाच्या संबंधी व्याख्यानाचे आयोजन करताना आपण त्यांचे आचार विचार अंगी करणे महत्वाचे आहे. शिवाजी महाराजांनी सामाजिक समता ते बरोबर स्वराज्याची संकल्पना राबवली होती. आजच्या तरुणांनी शिवाजी महाराजांच्या विचारांना स्मरण करून आचरणात आणणे गरजेचे आहे असे याप्रसंगी कार्यक्रमाचे **व्याख्याते डॉ. अनंत मरकाळे** यांनी सांगितले.

आजची तरुण पिढी आधुनिक दिसण्यासाठी पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करताना दिसून येते आणि त्यात काही गैरही नाही पण आपली भारतीय संस्कृती विसरूनही चालणार नाही.

अध्यक्षीय समारोप **प्राचार्य डॉ शिवदास शिरसाट** यांनी केला. त्यांनी विद्यार्थ्यांना आजची परिस्थिती लक्षात आणून देताना "तरुण गळ्यात माळा घालून, कपाळावर चंद्रकोर लावतो. भगवे कपडे घालतो, हातात भगवे दोरे बांधतो, कानात बाली घालतो, महाराजांसारखी दाढी कोरतो. गाडीवर जय शिवराय असं लिहिलेलं असतं. स्टिकर काढलेला असतो. आजची पिढी तोंडात गुटख्याच्या तोबरा भरून सगळीकडे पिचकारी मारत फिरत असते. ज्या महाराजांनी किल्ले बांधले त्यांनी कधीही स्वतःचे नाव दिले नाही त्या गडकिल्ल्यांवर जाऊन भिंती नावे लिहून भरून टाकतो. दारू पार्ट्या करून तिथेच बाटल्या फोडतो, कचरा करतो. आणि तरीही महाराजांसारखं दिसण्याचा प्रयत्न करतो. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी महाराजांनी आणि मावळ्यांनी रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. हाताशी अपुरे संख्याबळ,अपुरी शस्त्रसामुग्री ,अपुरा पैसा असताना बलाढ्य असणार्या मुघलांचा मुकाबला केला आणि ती स्वराज्यपूर्ती करून दाखवली तेथे आजचा तरुण काय करतोय ?", असा प्रश्न उपस्थित करताना प्राचार्यांनी तरुणांना शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाची जाणीव करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ रामदास भगत यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ जाधव यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ रमेश शिंदे डॉ. मुकुंद राजपंखे डॉ. दिलीप भिसे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी सहभाग नोंदविला व उत्साहात शिवस्वराज्य दिन साजरा केला.

# आंतरराष्ट्रीय योग दिन countdown उपक्रम अहवाल

## दिनांक 21 जून 2022

## 'योगाच्या माध्यमातून शारीरिक आणि मानसिक सुदृढता आणि जीवनातील सक्षमता निर्माण होते.'

## …..प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे दिनांक २१ जून २०२२ रोजी **८ वा आंतरराष्ट्रीय योगा दिवस** विविध कार्यक्रमाच्या आयोजनातून साजरा करण्यात आला. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभाग,




राष्ट्रीय छात्र सेना विभाग, क्रीडा विभाग आणि अंतर्गत तक्रार निवारण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने योग प्रशिक्षण कार्यशाळा, योग मार्गदर्शन व्याख्यान, योगाचे महत्त्व या विषयावर निबंध स्पर्धा व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ०६ वाजता राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांना योग प्रशिक्षण व योग साधना अभ्यास मार्गदर्शनाने झाली.

याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेचे विविध महाविद्यालयातील अधिकारी व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. सकाळी सात वाजता योग गुरु श्री उत्तरेश्वर पांचाळ यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांना योगा अभ्यास कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्यानंतर सकाळी ८:०० वा सामूहिक योग साधना आणि सामुहिक योग प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी मंचावर डॉ नरेंद्र काळे, प्राचार्य शिवदास शिरसाठ, श्रीमती आकांक्षा वट्टमवार, डॉ इंद्रजीत भगत, डॉ अनंत मरकाळे, डॉ भारत पल्लेवाड, डॉ अहिल्या बरुरे, प्रा रोहित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी योग शिक्षक आणि वेलनेस कोच श्रीमती अर्चना आमलापुरे या सिंगापूर वरून ऑनलाइन उपस्थित होत्या त्यांनी विद्यार्थ्यांना 'योगाच्या माध्यमातून शारीरिक आणि मानसिक सुदृढता आणि जीवनातील सक्षमता' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ शिरसाट यांनी **'सर्वसमावेशक यशाकरिता शरीरस्वास्थ्य हे केंद्रस्थानी ठेवावे.'** असा सल्ला दिला. *'**भारतातील युवाशक्ती ही जगातील सर्वात मोठी जमेची बाजू असून युवाशक्ती शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम ठेवण्याचे योगा हे महत्त्वाचे साधन आहे.**'* असे मत *डॉक्टर नरेंद्र काळे* यांनी व्यक्त केले.




याप्रसंगी योगा दिन काउंटडाऊन उपक्रमाअंतर्गत आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण देखील करण्यात आले. योगा काऊंटडाऊन उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत 14 मे 2022 रोजी रणधीर कदम योग प्रशिक्षक अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली योगा अभ्यास कार्यशाळा संपन्न झाली होती, 20 जून 2022 रोजी योग प्रशिक्षण कार्यशाळा तर 21 जून 2022 रोजी योग दिनानिमित्त योग प्रशिक्षण कार्यशाळा व योगाचे महत्त्व या विषयावर निबंध स्पर्धा आणि पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. *'**योग साधनेमुळे व्यक्तीचे मन मेंदू आणि मनगट सामर्थ्यवान बनते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी योगा अभ्यास करावा.**'*, असे या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी *डॉ. इंद्रजीत भगत* यांनी सूत्रसंचालन करताना सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ अहिल्या बरुरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग प्रमुख डॉ मुकुंद राजपंखे, उपप्राचार्य डॉ रमेश शिंदे, उपप्राचार्य श्री प्रताप जाधव , यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रोहिणी खंदारे, डॉ. भारत पल्लेवाड, डॉ अनंत मरकाळे यांनी कार्य केले.

# राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन
# दिनांक 24 सप्टेंबर 2022

## अहवाल

### *श्रमदानाने आणि व्याख्यानाने यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा*

### अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात

विद्यार्थ्यांच्या प्रचंड उत्साहात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी या.से तो विभागात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना गीताने झाली.

आपल्या देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची महत्वाची भूमिका दिसून येते. देशातील युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य हे देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे. युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षण क्षेत्राद्वारे होत असताना दिसत आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. तरुणांमध्ये समाजसेवेची जाण झाल्यानंतर त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे राष्ट्रसेवा होय.

*"राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सांगताना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्त्व विशद करतात."* असे याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत भगत यांनी सांगितले.

शिक्षण क्षेत्रातून सेवासंस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा, या हेतूने शिक्षण क्षेत्रात विविध योजना वेगवेगळ्या स्तरावर राबविल्या जातात. शिक्षण क्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्चशिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमापर्यंत राष्ट्रसेवेची व्याप्ती वाढताना दिसून येते. डॉ. डी. एस. कोठारी शिक्षण आयोगाने शिक्षणाच्या सर्वच टप्प्यांवर विद्यार्थी समाजसेवेशी जोडला जावा, अशी शिफारस १९६४-६६ दरम्यान केली आणि १९६७ मध्ये राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेत एनसीसीसोबत एनएसएस असावे हे मान्य झाले. त्यानंतर कुलगुरूंच्या परिषदेत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वागत होऊन २४ सप्टेंबर १९६९ रोजी महात्मा गांधीजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने तेव्हाच शिक्षणमंत्री व्ही. के. आरव्ही राव यांनी देशातील ३७ विद्यापीठांत प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना सुरू केली. आज देशातील हजारो महाविद्यालये व लक्षावधी विद्यार्थी या योजनेत सहभागी झाले आहेत. २४ सप्टेंबर हा 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' म्हणून साजरा केला जातो.

'Not me, but you' माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचिन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टौप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे व लाल रंग हे तरुणांचे सळसळते रक्त हे राष्ट्र उभारणीसाठी असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना

नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे. नियमित कार्यक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबिर, सरकारच्या विविध कार्यक्रमांत सहभागी होतात.

महात्मा गांधींचा 'खेड्याकडे चला' हा विचार घेऊन गावांमध्ये विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरांमार्फत निर्मलग्राम, सर्वांगीण व शाश्वत ग्रामविकास, चर खोदणे, रस्ते बांधणी, पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षारोपण, रक्तदान आदी कार्य श्रमदान, पथनाट्य, रॅली, उद्‍्बोधक चर्चा, शिवारफेरी, गावकरी संवाद या माध्यमांतून समाजाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात युवाशक्ती वा ऊर्जास्त्रोत पुरविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करीत आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उद्दिष्टे, ब्रीदवाक्य व बोधचिन्ह हे या उपक्रमाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करतात. स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा, तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेची युवा चळवळ अखंड सुरू राहावी यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मूलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार या युवा चळवळीच्या माध्यमातून करीत आहे. "राष्ट्रीय सेवा योजनेची ही युवा चळवळ राष्ट्र व समाजासाठी तत्पर व सक्षम व्हावी, यासाठी प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांचे महत्व आहे" असे मत

अध्यक्ष म्हणून *उपप्राचार्य डॉक्टर रमेश शिंदे* यांनी व्यक्त केले. प्रमुख वक्ते म्हणून प्राध्यापक *रोहित पाटील "अलीकडच्या काळात समाजात वेगवेगळ्या विचित्र घटना घडताना आपण पाहत आहोत. अशा परिस्थितीत आजचा तरुण कुठे तरी भरकटत जाऊ नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातून समाजपरिवर्तन करण्याचे कार्य आज राष्ट्रीय सेवा योजनेचा तरुण करीत आहे. पर्यावरणासंबंधी वृक्षारोपण, ग्रीन ऑडिट, आपत्ती व्यवस्थापन, जैवविविधता, निर्माल्य संकलन, जलसाक्षरता, समाजाप्रती बेटी बचाव अभियान, आर्थिक, कौटुंबिक व शैक्षणिक सर्वेक्षण आदी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहे"* असे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील गुणवंत प्राध्यापक श्रीपाद कदम यांनी 'सारथी' संशोधन फेलोशिप प्राप्त केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना विभागात कार्य करणाऱ्या उत्कृष्ट स्वयंसेवकाला देण्यात येणारा विशेष पुरस्कार राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी *कु. प्रतीक्षा विजय मस्के यांना 2021-22 या शैक्षणिक वर्षातील सर्वोत्कृष्ट स्वयंसेविका* म्हणून घोषित करण्यात आला. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी तीस मिनिटे महाविद्यालय परिसरात स्वच्छता उपक्रम राबविला.

कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना डॉ रामेश्वर जगदाळे, प्राध्यापक नरेंद्र चोले, प्राध्यापक अमोल सोळुंके, प्राध्यापक दिगंबर वंडकर यांनी विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी *डॉ इंद्रजीत रामदास भगत* यांनी, प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी *डॉ. अनंत मरकाळे* तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी कु. प्रतीक्षा विजय मस्के यांनी केले.


महाविद्यालय
le: 18.722709
ude: 76.377065
on: 652.44±1 m
cy: 21.7 m
24 September 2022
राष्ट्रीय सेवा योजना दिन 2022-23
Powered by Note


le: 18.722719
ude: 76.377016
on: 652.44±1 m
cy: 19.6 m
24 September 2022 11:57
राष्ट्रीय सेवा योजना दिन 2022-23


9.24 12:04


राष्ट्रीय सेवा योजना विभाग
PPO F19 Pro+


9.24 12:50


9.24 12:51

# *यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन संपन्न*

दिनांक 25 सप्टेंबर 2022 रविवार रोजी  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना व वाणिज्य अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सप्टेंबर महिन्यात सुरू असलेला पोषण महा व राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन यांचे औचित्य साधून नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. नेत्र तपासणी शिबिरा करिता अंबाजोगाईतील ख्यातनाम नेत्रतज्ञ डॉक्टर योगेश मुळे यांची उपस्थिती होती. डॉक्टर योगेश मुळे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मानवी दृष्टीला अपायकारक अशा विविध सवयी, विविध कारणे आणि दृष्टी दोषाला संपविण्याकरिता आहारातील आवश्यक घटक याबद्दल विशिष्ट माहिती दिली. नेत्र तपासणी शिबिरा करिता आलेल्या सर्व विद्यार्थी व परिसरातील नागरिकांना याप्रसंगी डॉक्टर योगेश मुळे यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य शिवदास शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर इंद्रजीत भगत यांनी कार्यक्रमाचे उद्देश व प्रास्ताविक सांगून केली.




कार्यक्रमाला अध्यक्ष स्थानी राष्ट्रीय छात्रसेनेचे प्रमुख प्राध्यापक रोहित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याबरोबरच मंचावर राजाभाऊ भगत, प्राध्यापक श्रीपाद कदम, प्राध्यापक अमोल सोळुंके, प्राध्यापक शैलेश जाधव व राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी कु प्रतीक्षा मस्के, वाणिज्य अभ्यास मंडळ प्रमुख रंजीत किर्दंत यांची प्रमुख उपस्थिती होती. नेत्रदान शिबिरा करिता महाविद्यालयातील 88 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली त्यापैकी 61 विद्यार्थ्यांची व तीन नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या टीम टप्प्यात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वाणिज्य अभ्यास मंडळ प्रमुख प्रा. श्रीपाद कदम यांनी केले.




09 25 11:06


O F19 Pro+


atitude: 18.722756
ongitude: 76.376969
ltitude: 580.1±3 m
ccuracy: 14.4 m
ime: 25 September 2022 11:16
ote: मोफत नेत्र तपासणी शिबिर
राष्ट्रीय सेवा योजनांची व राष्ट्रीय छात्र सेना 2022-23


de: 18.722749
tude: 76.37698
tion: 652.24±7 m
acy: 19.1 m
25 September 2022 11:23
मोफत नेत्र तपासणी शिबिर
सेवा योजनांची व राष्ट्रीय छात्र सेना 2022-23


itude: 18.72274
igitude: 76.376979
vation: 652.24±3 m
uracy: 12.2 m
e: 25 September 2022 11:24
e: मोफत नेत्र तपासणी शिबिर


Latitude: 18.722754
Longitude: 76.376974
Elevation: 652.24±2 m
Accuracy: 14.9 m
Time: 25 September 2022 11:24
Note: मोफत नेत्र तपासणी शिबिर
राष्ट्रीय सेवा योजनांची व राष्ट्रीय


itude: 18.722756
ngitude: 76.376969
vation: 652.24±6 m
curacy: 14.7 m
ne: 25 September 2022 11:25
te: मोफत नेत्र तपासणी शिबिर
ट्रीय सेवा योजनांची व राष्ट्रीय छात्र सेना 2022-23


Latitude: 18.722751
Longitude: 76.376991
Altitude: 580.1±3 m
Accuracy: 15.2 m
Time: 25 September 2022
Note: मोफत नेत्र तपासणी शिबिर
राष्ट्रीय सेवा योजनांची व राष्ट्रीय

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संविधान दिन साजरा....

अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आज दिनांक 26 नोव्हेंबर 2022 रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी भारतरत्न व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मा. आ. पृथ्वीराज साठे, श्री.राजेश्वर चव्हाण, श्री.गोविंदराव देशमुख, श्री.सुनील लोमटे, श्री.रणजीत लोमटे,श्री.अजित गरड, प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजीत भगत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व भारतीय संविधान उद्देशिका पत्रिकेचे सामूहिक वाचन केले. प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ यांनी भारतीय लोकशाहीला सुद्दढ करणारी व भारतीय संस्कृतीला जपत एकात्मतेचे संदेश देणारी भारतीय राज्यघटना ही जगात सर्वात समृद्ध आहे, असे नमूद केले आहे. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी.के जाधव, डॉ. अहिल्या बरुरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अनंत मरकाळे, डॉ. दिलीप भिसे, प्रा. भारत पल्लेवाड, प्रा. सुनील भोसले, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. संजय सुरेवाड यांनी व्यक्त केले.



## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्वच्छता उपक्रमाचे आयोजन……




आज दिनांक 22 नोव्हेंबर 2022 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजीत भगत, श्री दिगंबर व्हंडकर व अमोल सोळुंके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




Topic: Marathwada Muktisangram Dinachya Amrut Mahotsavi Varshanimitt Online Vyakhyan

Dt. 17, 18 & 19 Sept. 2022 Time 09:30 am

Join Zoom Meeting

https://us02web.zoom.us/j/89961269242?pwd=TyttVDlsUnRwWGxNMDhpdlVTbUhuUT09

Meeting ID: 899 6126 9242

Passcode: 46814


**19 ऑक्टोबर 2022**

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन










Organizer's Name & Contact : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय N.S.S & N.C.C. अंबाजोगाई

Team :

| Sr. No. | Donor Name | Age | M / F | Weight | Blood Group | Hb |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्वामी दिलीप संजय | 55 | m | A+ | 9527 | 362816 |
| 2 | रोहीत रमेश पाटील | 32 | m | B+ | 708.34 | 86400 |
| 3 | खाडे प्रविण बलवंत | 19 | M | AB+ | 8208 | 125284 |
| 4 | मुंडे अशोक कल्याण | 18 | m | A+ | 91302 | 79612 |
| 5 | मुळेव बालासाहेब धुळे | 18 | m | B+ | 9872 | 573197 |
| 6 | गिरी प्रेमकुमार कैलास | 18 | m | B+ | 7249 | 738725 |
| 7 | सान्प अनिल नवनाथ | 18 | m | B+ | 9322 | 682292 |
| 8 | सोनवणे रोहीत विष्णु | 18 | m | B+ | 7499 | 038763 |
| 9 | हजारे प्रकाश मुकुंदराव | 21 | M | A+ | 92591 | 35205 |
| 10 | प्रमित सुधीर देवकते | 18 | M | B+ | 7498 | 730480 |
| 11 | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |



**निमंत्रण पत्र**

प्रति,
मा. अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय,
अंबाजोगाई.

**विषय : रक्तदान शिबीरासाठी सहकार्य मिळणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, आमच्या महाविद्यालयात क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने **रक्तदान शिबीराचे आयोजन** दि. 19/10/2022 **रोजी सकाळी** 10:30 वा. करण्यात आले आहे.

तरी आपण रक्तदान शिबीरासाठी सर्व कर्मचारी व साहित्य पाठवून सहकार्य करावे.

ही विनंती.

प्रा. डॉ. इंद्रजीत भगत -7020843425
प्रा. भारत पल्लेवाड -9881257856
प्रा. रोहित पाटील -7083486400



अंबाजोगाई | प्रतिनिधी:–

दानशूरता हे माणूसपणाचे लक्षण असते. विविध प्रकारचे दान मनुष्य करीत असतो, मात्र या सर्व दानामध्ये रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान

## जीवनदान देणारे दान म्हणजे रक्तदान : डॉ.सिरसाठ



अंबाजोगाई/प्रतिनिधी :

दानशूरता हे माणूसपणाचे लक्षण असते विविध प्रकारचे दान मनुष्य करीत असतो मात्र या सर्व दानामध्ये रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे असे विचार डॉ. शिवदास शिरसाट यांनी व्यक्त केले.

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये आज दिनांक १९ ऑक्टोबर रोजी एन.सी.सी. एन.एस.एस. व क्रीडा विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाट हे होते.

सर्वश्रेष्ठ दान आहे असे नमूद केले याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. अनुराधा

रक्तदान केले.

शिबिर संपन्न करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. इंद्रजीत भगत,

## AIDS दिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात विविध स्पर्धा आयोजित.

### एड्स जनजागरण मोहिमेत युवकांची भूमिका महत्त्वाची: डॉ. शिवदास शिरसाठ

### तरुण-तरुणींनी एच. आय.व्ही. विषयी शास्त्रीय माहिती घ्यावी :श्रीमती सुकेशनी गंडले
















मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना तसेच विज्ञान शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने रेड रिबन क्लब स्थापन करण्यात आला. या रेड रिबन क्लबच्या माध्यमातून दिनांक १ डिसेंबर 2022 रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स जनजागरण करण्याच्या दृष्टीने उत्स्फूर्त  भाषण, पोस्टर प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा व एड्स जनजागरण मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाट होते. तर प्रमुख मार्गदर्शक सुकेशीनी गंडले, समुपदेशक आय.सी.टी.सी. स्वामी रामानंदतीर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई ह्या होत्या. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते एड्स जनजागृतीपर पोस्टर प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या पोस्टर विषयी माहिती देऊन या पोस्टरच्या माध्यमातून एड्स जनजागृती कशा पद्धतीने करायची याविषयी माहिती दिली. महाविद्यालयात उत्स्फूर्त भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यात ४० स्वयंसेवक सहभागी झाले. ०६ स्वयंसेवकांनी भाषणात सहभाग नोंदविला. तिनं उत्कृष्ट भाषांनांना क्रमांक देण्यात आले व पारितोषिक घोषित करण्यात आले. उत्स्फूर्त भाषण स्पर्धा आयोजित करण्याची जबाबदारी कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत भगत यांनी पर पाडली.

त्यानंतर मान्यवरांनी रांगोळी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी काढलेल्या रांगोळ्यांना भेट देऊन रांगोळीचे अवलोकन केले. त्यावेळी एड्स जनजागृती विषयी संदेश देणाऱ्या रांगोळ्या विषयी विद्यार्थ्यांनी मान्यवरांना माहिती दिली. यानंतर विद्यार्थ्यांना एड्स रोगाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले त्यांनी हा कार्यक्रम घेण्यामागची भूमिका आपल्या प्रास्ताविकातून सांगितली. यानंतर श्रीमती सुकेशनी गंडले यांनी एच. आय. व्ही. होण्याची कारणे व उपाय याविषयी शास्त्रशुद्ध माहिती सांगितली. आजच्या तरुणांनी एड्स रोगाविषयी संपूर्ण माहिती करून घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. यानंतर या कार्यक्रमाचा अध्यक्षीयसमारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाट म्हणाले की, एड्स रोगाविषयी जागृती करण्यात युवकांची महत्त्वाची भूमिका आहे. महाविद्यालयीन तरुण-तरुणी यांच्यात एड्स रोगाविषयी शास्त्रीय माहिती प्रसारित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. समाजात एड्स रोगाविषयी असणारे समज गैरसमज दूर करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात असे याप्रसंगी त्यांनी सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील प्रश्न मार्गदर्शकांना विचारले त्यावर मार्गदर्शकांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार विद्यार्थिनी कु. राणी कांबळे यांनी मानले. तर सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी कु. पुजारी हिने केले. यावेळीश्रीमती रेखा बनसोडे ग्रामीण विकास मंडळ अंबाजोगाई, उपप्राचार्य प्रा. डॉ. रमेश शिंदे उपप्राचार्य प्रा. पी के जाधव, राष्ट्रीय योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. इंद्रजीत भगत, राष्ट्रीय छात्र सेना विभाग प्रमुख प्रा. लेफ्टनंट प्रा. आर आर पाटील, प्रा सय्यद चाऊस, प्रा. धर्मराज हाडबे प्रा. प्रणाली शिंदे प्रा. जाधव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक कार्यालयातील कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.